ISSN 2278-8808 SJIF 2014 = 4.889
An International Peer Reviewed & Referred
SCHOLARLY RESEARCH JOURNAL
FOR INTERDISCIPLINARY STUDIES

# डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या 1942 ते 1946 या कालखंडातील कार्याचा चिकित्सक अभ्यास

**विजय जनार्दन चव्हाण, Ph. D.**

*एस.एन.डी.टी, शिक्षणाशास्त्र महाविद्यालय, कर्वे रोड, पुणे–411004*

***Abstract***

*डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांनी वेगवेगळया क्षेत्रामध्ये कार्य केले आहे. सत्याग्रह, खोती आंदोलन, हैद्राबाद मुक्ती संग्राम, स्त्रीयांचे प्रश्न, घटनेचे शिल्पकार थोर अर्थशास्त्रज्ञ, राजनिती, समाजशास्त्रज्ञ व ब्रिटिश मंत्रीमंडळातील त्यांचे सर्वोच्च स्थान व आपल्या देशासाठी धरणे, वीज, शेती, कामगार संघटन व वंचित घटक व पर्यटन या क्षेत्रामध्ये भरीव स्वरुपाच्या त्यांनी केलेल्या कार्याची नोंद आढळते. दुसऱ्या महायुध्दातील अन्यायी राश्ट्राच्या विरोधात जावून ब्रिटिशांना मानवतावादी विचार करण्यासाठी प्रवृत्त करणारे व त्यांना युध्दासाठी पाठिंबा देऊन त्या बदल्यात स्वातंत्र्याचा विचार महत्वाचा वाटतो, लढाईचा विचार आपल्या आत्मोन्नतीसाठी आहे, असे सांगणारे बाबासाहेब आंबेडकर आपल्या देशाच्या जल प्राधिकरणाचा विचार करुन संपूर्ण देशामध्ये नद्यांचे जाळे तयार व्हावे, व संपुर्ण देश एकसंघ ठेवण्यासाठी राश्ट्राची उभारणी कशी असावी याचे मार्गदर्शन करतात, स्त्रीयांसाठी स्वातंत्र्य म्हणजे देशाची प्रगती घडवून आणणारा हा घटक आहे, असे म्हणत असताना, स्त्रीयांना कामाच्या ठिकाणी वेगवेगळया उपाययोजना करुन स्त्री आणि पुरुश यांचे वेतन समान असावे, यासाठी प्रयत्न करुन कृतीद्वारे कामगारांच्या कामाचे तास, रजा व कामाच्या ठिकाणी वेगवेगळया उपाययोजना करताना दिसतात, या सर्व बाबींवरुन डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्यामध्ये मानवतावादी दृश्टीकोनाबरोबरच देशाचा विकास याही बाबी आढळून येतात.*

*Scholarly Research Journal's is licensed Based on a work at www.srjis.com*

**प्रस्तावना**

ज्यांना ब्रिटिश धार्जिणे म्हटले जात होते त्यात बाबासाहेब आंबेडकर यांनी 1942 ते 1946 मध्ये भारतीय जनतेच्या हितासाठी अनमोल स्वरुपाची कार्य केलेले आढळते. त्यांनी ब्रिटिश मंत्रीमंडळाने सामिल होण्यामागची भूमिका दि. 13 नोव्हेंबर 1942 रोजी मुंबई आकाशवाणी केंद्रावरुन भाशण देऊन केल्याचे दिसून येते. भारतीय मजूर आणि आणि महायुध्द या विशयावर बोलताना ते म्हणाले होते की, युध्द केवळ पृथ्वीवरील प्रदेश वाटून घेण्यासाठी सुरु झालेले नाही, तर ते माणसामाणसात आणि राश्ट्राराश्ट्रात सहजीवनाचे नाते कसे असावे, याविशयी मुलभूत फरक घडवून आणण्यासाठी घडत आहे. ही सामाजिक, पुर्नरचनेची मागणी आहे म्हणून नाझी वादाचा विजय झाला तर नाझी समाजरचनेखाली स्वातंत्र्याची गळचेपी होईल व समता नाकारण्यात येईल. बंधूता समूळ नश्ट करण्यात येईल. स्वातंत्र्य आणि नव समाज रचना ही फळे लोक ाहीच्या विजयामुळे लाभतील. त्यासाठी केवळ स्वातंत्र्य मिळून पुरेसे कार्य होणार नाही, तर स्वातंत्र्यांचे मुल्य तुम्ही कोणत्या प्रकारची समाजरचना आणि राज्यघटना निर्माण करु पाहता, यावर अवलंबून

असेल म्हणून कामगारांनी आपली सर्व भाक्ती एकवटून छोडो भारत ही मागणी 18 व 19 जुलै 1942 रोजी भारतीय दलित परिशदेच्या निमित्ताने नागपूर येथे बाबासाहेब आंबेडकरांनी हे विचार व्यक्त केले. दि. 19 जुलै 1942 रोजी ब्रिटिश गर्व्हनरचा राजदूत यांनी या अधिवे ानाची संपूर्ण चौकशी करुन ब्रिटिश मंत्रीमंडळामध्ये बाबासाहेब आंबेडकरांचा समावेश केला आहे याबाबतची वार्ता सांगितली. दि. 20जुलै 1942 बाबासाहेबांनी ब्रिटिश गव्हर्नरला तार करुन मंत्रीमंडळाचा स्वीकार केला. त्यापूर्वी त्यांनी युध्दविशयक ब्रिटना विनाअट पाठिंबा दिला व असे म्हटले की, हे महायुध्द झोटिंग ाही आणि लोकशाही यामध्ये झुंपली आहे व ही झोटिंगशाही कोणत्याही नैतिक पायावर आधारलेली नाही. ती वांशिक अभिमानावर आधारलेली आहे. नाझीवादाने मनुश्यमात्राच्या भवितव्याला मोठा धोका निर्माण झालेला आहे व या जगाच्या पाठीवरुन माणसामाणसांमध्ये मानवतेचे जोडणारी लोकशाही नश्ट होवू नये म्हणून तुम्ही प्रयत्नांची पराकाश्ठा केली पाहिजे, आपली लढाई संपूर्ण अर्थाने आत्मोन्नतीची आहे त्यात सामाजिक किंवा भौतिक असे काही नाही. आमची लढाई संपत्ती किंवा सत्येसाठी नाही तर ती स्वातंत्र्यासाठी आहे. मानवी हक्क आणि मनुश्याचा दर्जा संपादण्यासाठी आहे. याच भाशणात डॉ.बाबासाहेब आंबेडकर म्हणतात की दलित समाजाने जगातील इतर लोक ाहीवाद्यांच्या बाजूने लोक ाही मुल्य आणि संस्कृती यांचे जतन करण्यासाठी झगडले पाहिजे, जर लोकशाही नश्ट झाली तर आपल्या भवितव्याचे वाटोळे होईल. यासाठी ते उपदेश करतात की, तुम्ही शिक्षण घ्या, चळवळ करा, संघटना करा, स्वतःवर विश्वास ठेवा, न्याय हा आपल्या बाजूने असल्यामुळे आम्ही लढाईत पराभूत होवू असे मला वाटत नाही. व अशा प्रकारची लढाई करण्यामध्ये मला आनंद होत आहे. दि.20 जुलै 1942 रोजी बाबासाहेबांनी मजूर विभागाच्या पदभाराचा स्वीकार केला. तेव्हापासून त्यांनी स्त्री आणि पुरुश यांच्या वेतनातील तफावत त्यांनी दूर केली. दोघांचे वेतन समान केले. कामगार स्त्रीयांना प्रसुतीपूर्व आणि प्रसुतीनंतर एक एक महिन्याची भर पगारी रजा मंजूर केली. बाळंतपणानंतर एक महिन्याने कामावर येणाऱ्या स्त्रीयांच्या बाळाच्या सोयीसाठी एक तासाच्या अंतराने स्तनपान देण्याची सोय केली. त्यांच्या बाळाची काळजी घेण्यासाठी पाळणाघराची योजना सुरु केली. त्यापूर्वी सुशिक्षित व अशिक्षित तरुणांसाठी देशभर सेवायोजन कार्यालयांची स्थापना केली. कामगारांच्या हिताला प्राधान्य देऊन नवीन कायदे तयार केले. कामगारांनी संपाचे सतत हत्यार उचलू नये म्हणून मालक व कामगार व सरकार प्रतिनिधी यांच्या संपूर्ण देशभर समित्या स्थापन केल्या. व तेथे सामंजस्याने निर्णय घेवून औद्योगिक उत्पादन कसे वाढविता येईल? असे धोरण आखले. खाण कामगारांच्या आरोग्याची काळजी घेण्यासाठी कामाच्या ठिकाणी रुग्णालये सुरु केली. विमान वाहतूक टपाल व माल यांची ने–आण करण्यासाठी उपयोगात आणली जात होती. ती प्रवासी वाहतूकीसाठी सुरु करण्यात आली. आपल्या बांधकाम विभागांतर्गत मोठमोठी शहरी विमानतळे उभारणीचे काम त्यांनी याच उद्‌देशाने सुरु केले. आग्रा येथील भाहाजहान बाद ाहाने उभारलेल्या ताजमहल या ऐतिहासिक वास्तूच्या कळसाला बारीक भेगा पडत होत्या. एका पिढीजात गवंडयाचे हे काम त्याला नोकरी द्यावी या बोलीवर या भेगा बुजविण्यात यश मिळविले होते. परंतू अधिकारी या गवंडयाला

नोकरीच्या बाबतीमध्ये कोणतीही दाद देत नव्हते. त्याने उर्दू भाशेमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी कळविले असता बाबासाहेब आंबेडकरांनी संपूर्ण चौकशी करुन या गवंडयाला उपअभियंता या नोकरीवर रुजू केले व 1956 पर्यंत हा गवंडी सेवाज्येश्ठतेनुसार एक्झिक्युटिव्ह इंजिनिअर झाला होता. 1942 ते 1946 या कालखंडामध्ये सार्वजनिक बांधकाम विभागातंर्गत पाटबंधारे व जलसिंचन हे विभाग एकत्र असत. नद्यांचे जाळे,रेल्वे रुळाप्रमाणे पसरलेली आहे. सन 1935च्या कायद्यानुसार वाहणाऱ्या नद्या सर्व प्रदेशांच्या मालकीच्या मानल्या जात होत्या, याबाबत बाबासाहेब आंबेडकरांचे म्हणणे असे होते की या संपूर्ण नद्या केंद्र सरकारच्या अखत्यारीत याव्यात, जर त्या राज्यांतर्गत राहिल्या तर वरच्या अंगाच्या राज्याने धरण बांधून पाणी अडविले तर सखल प्रदेशातील राज्यांना त्या नदीचा उपयोग होणार नाही. कायदा बदलाची प्रक्रिया वेळकाढू होती म्हणून, त्यांना जलप्राधिकरण नावाच्या संस्था प्रत्येक राज्यात त्यांनी सुरु केल्या व त्यांना नियंत्रित करणारी व व्यापकहित जपणारी जलप्राधिकरण संस्था केंद्रामध्ये निर्माण करुन पाणी वाटपाचे संपूर्ण अधिकार केंद्राकडे घेतले. धरण उभारणी, जलसिंचन व त्यासोबतच पाण्यापासून वीज निर्मितीचे प्रकल्प त्यांनी सुरु केले. भारतात औद्योगिक क्रांती घडविण्यात डॉ.बाबासाहेब आंबेडकरांचा मोठा सहभाग होता. त्यांनी दामोदर नदीवर तीन ठिकाणी बांध घालून धरण उभारणीचा निर्णय पक्का केला होता. त्यापूर्वी अमेरिकेतील टेनेली नदीवर बांधण्यात आलेल्या धरणाची परिस्थिती ही दामोदर खोऱ्यासारखी असल्याचे त्यांच्या लक्षात आले होते व ही धरणे पूर्ण करण्याची संपूर्ण जबाबदारी त्यांनी पार पाडली होती. या कामासाठी रायबहाद्दूर खोसला यांना इंजिनिअर म्हणून नेमून सर्व प्रकल्प पुर्ण केले होते. अ ा प्रकारे 1942 ते 1446 या कालावधीमध्ये मंत्री असताना भारताच्या भोती, पाणी, धरण, व वीज या क्षेत्रांमध्ये अमुलाग्र बदल घडवून आणण्याचे कार्य डॉ.बाबासाहेब आंबेडकरांनी केलेले आहे.

**संदर्भः–**


1) *प्रकाशक, अनुभव अक्षरधन*
   *108 / 01 राजलक्ष्मी, शिवाजी पार्क, दादर, मुंबई–400 028*
2) *डॉ.बाबासाहेब आंबेडकरः नियोजन, जल व विद्युत विकास भूमिका व योगदान*
   *पृश्ठ क्र 33*
3) *मानवी हक्क, प्र ाांत पब्लिके ान,*
4) *डॉ.बाबासाहेब आंबेडकर, 1946, डॉ.बाबासाहेब आंबेडकर : लिखाण आणि व्याख्याने*
   *खंड–13, पृश्ठ क्र 9.*
5) *प्रतिबंध, महिला स्वातंत्र्याचा भोध, अथर्व पब्लिकेशन, पुणे.*